जा.क्र.नमुंमपा/परवाना/रा.फे.धो./श.फे.स.बै.३/२९४६/२०१४
दिनांक : ०९/१२/२०१४

# बैठकीचे इतिवृत्त

नवी मुंबई महानगरपालिका शहर फेरीवाला समितीची दिनांक ०२/१२/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

मा.अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती तथा आयुक्त, नमुंमपा यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या बैठकीस खालील प्रवर्ग ०१ ते ०४ मधील सदस्य उपस्थित होते.

१) श्री. दादासाहेब चाबुकस्वार,उप आयुक्त (परवाना), नमुंमपा तथा निमंत्रक, शहर फेरीवाला समिती

**प्रवर्ग -१**

१) श्री.प्रकाश ठाकूर, सहा.संचालक नगररचना, नमुंमपा
२) श्री.किरण शिंदे, अतिरिक्त शहर नियोजनकार, सिडको लि.
३) श्री.डी.एस.ठाकूर, सहा.पोलिस आयुक्त (वाहतुक), नवी मुंबई
४) श्री.दिपक परोपकारी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नमुंमपा
५) श्री.कृष्णा जाधव, प्रादेशिक अधिकारी, महापे, म.औ.वि.म.

**प्रवर्ग - २**

१) मा.श्री.जयवंत दत्तात्रय सुतार
२) मा. श्री.सदानंद रघुनाथ नार्वेकर
३) मा.श्री.प्रफुल्ल म्हात्रे
४) मा.श्रीम.सुनिता संभाजी साबळे
५) मा.श्री.नामदेव सावळेराम आहिरे
६) मा. श्री.अनिल गेणु चिकणे
७) मा. श्री. बळीराम गोविंदा आंभोरे
८) मा.श्रीम.कल्पना दत्तात्रय सुकाळे

**प्रवर्ग - ३**

१) मा.श्री. विनोद विनायक म्हात्रे
२) मा.श्री.भाऊसाहेब कोंडीबा तोरमल
३) मा.श्री. देव प्रेमनाथ शर्मा
४) मा. श्रीम.साधना ज्ञानेश वाणी

**प्रवर्ग - ४**

१) मा. श्री.धोंडीराम सोपानराव भद्रे
२) मा.श्री.प्रमोद रघुनाथ जोशी
मा.श्रीम.सुलोचना वासुदेव पाटील

**विशेष निमंत्रीत सदस्य**

**१)** श्री.सुभाष इंगळे, उप आयुक्त (परिमंडळ-१/२), नमुंमपा
**२)** श्री.सुभाष गायकर, प्र.उप आयुक्त (अतिक्रमण), नमुंमपा
**३)** श्री.प्रल्हाद ज्ञा.खोसे, प्र.मुख्य बाजार व परवाना अधिकारी, नमुंमपा
**४)** श्री.अभय जाधव, कनिष्ठ विधी अधिकारी, नमुंमपा

विषयसुचिमध्ये नमूद केलेल्या विषयानुसार चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

| विषय क्रमांक | विषय तपशिल | झालेली चर्चा | घेतलेला निर्णय |
|---|---|---|---|
| ०१ | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ०८ विभाग कार्यालयांतर्गत फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे, बायोमेट्रीक सर्व्हे करणे, रजिस्ट्रेशन करणे व ओळखपत्र देणे यासाठी संगणक प्रणाली विकसित करणे व त्याची तीन वर्षे देखभाल दुरुस्तीची कामे करणे या निविदा कामामध्ये **“फेरीवाला व्यावसायिकास फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र देणे”** या वाढीव कामाचा समावेश करुन ऑनलाईन फेरनिविदा काढणे. | श्री.डी.एस.चाबुकस्वार, निमंत्रक, शहर फेरीवाला समिती तथा उप आयुक्त (परवाना) यांनी उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत करुन तृतीय बैठकीची पार्श्वभुमी थोडक्यात विशद केली.<br>नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ०८ विभाग कार्यालयांतर्गत फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे, बायोमेट्रीक सर्व्हे करणे, रजिस्ट्रेशन करणे व ओळखपत्र देणे यासाठी संगणक प्रणाली विकसित करणे व त्याची तीन वर्षे देखभाल दुरुस्तीची कामे करणे तसेच फेरीवाला अर्ज शुल्क, नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्क आकारणी करणेस शहर फेरीवाला समितीने ठराव क्र.०१ दिनांक २९/०५/२०१४ अन्वये मंजूरी दिलेली आहे.<br>तथापी केंद्र शासनाने मंजूर केलेल्या **“पदपथावरील विक्रेते (उपजिविका व संरक्षण व पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४”** च्या अनुषंगाने फेरीवाला व्यावसायिकास नोंदणी प्रमाणत्र देणे आवश्यक आहे. त्यामुळे उक्त निविदेमधील कामाच्या व्याप्तीमध्ये (Scope of work) **“फेरीवाला व्यावसायिकास फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र देणे”** या वाढीव कामाचा समावेश करुन ऑनलाईन फेरनिविदा काढणे आवश्यक आहे. याकरीता सदरचा विषय समिती सभापटलासमोर निर्णयास्तव सादर करण्यात आलेला आहे. | नवी मुंबई महानगर-पालिका क्षेत्रातील ०८ विभाग कार्यालयांतर्गत फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे, बायोमेट्रीक सर्व्हे करणे, रजिस्ट्रेशन करणे व ओळखपत्र देणे यासाठी संगणक प्रणाली विकसित करणे व त्याची तीन वर्षे देखभाल दुरुस्तीची कामे करणे या निविदा कामामध्ये **“फेरीवाला व्यावसायिकास फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र देणे”** या वाढीव कामाचा समावेश करुन ऑनलाईन फेरनिविदा काढणेच्या कामास सर्व उपस्थित सदस्यांनी मंजूरी दिली. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | केंद्र शासनाच्या **“पदपथावरील विक्रेते (उपजिविका व संरक्षण व पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४”** ची महापालिका क्षेत्रात अंमलबजावणी करणेबाबतचे प्रारुप सादरीकरण | **“पदपथावरील विक्रेते (उपजिविका व संरक्षण व पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४”** केंद्र शासनाने दिनांक ०५, मार्च २०१४ अन्वये मंजूर केलेला आहे.<br>अधिनियमातील कलम ३६(१) मधिल तरतुदीनुसार सदर अधिनियम अंमलात आल्यापासून एक वर्षाच्या कालावधीमध्ये राज्य शासनाने नियम तयार करावयाचे आहेत. तसेच कलम ३८(१) नुसार सदर अधिनियम अंमलात आल्यापासून सहा महिन्याच्या कालावधी मध्ये राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शहर फेरीवाला समितीशी सल्लामसलत करुन फेरीवाल्यांसाठी योजना तयार करावयाची आहे.<br>राज्य शासनाने शासन निर्णय क्र.राफेधो-२०१३/प्र.क्र.३३२/नवि-३४ दिनांक १० जुलै २०१४ अन्वये फेरीवाल्यांसाठी नियम व योजना तयार करण्यासाठी शासन स्तरावर ०६ सदस्यीस समिती नियुक्त केलेली असून समितीच्या ०२ बैठका पार पडलेल्या आहेत.<br>उक्त अधिनियमाची महापालिका क्षेत्रात अंमलबजावणी कश्या पध्दतीने करण्यात येईल याबाबतचे प्रारुप सादरीकरण महापालिकेने तयार केलेले असून ते सादरीकरण सर्व सदस्यांना दाखविण्यात आले.<br>१) फेरीवाल्यांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण करणेकरीता अंगिकारण्यात येणारी कार्यपध्दती<br>२) महापालिका क्षेत्रात फेरीवाला क्षेत्र, बंधयुक्त फेरीवाला क्षेत्र व ना फेरीवाला क्षेत्र निश्चित करणेबाबतची अंगिकारण्यात येणारी कार्यपध्दती<br>समिती सदस्यांना महापालिका क्षेत्राची माहिती असल्याने त्यांनीही फेरीवाला व्यवसायासाठी योग्य जागांची तपशिल यादी व अनुषंगीक माहिती लेखी स्वरुपात दिल्यास त्या जागांचाही विभाग कार्यालयामार्फत विचार करता येईल असे मा.आयुक्त तथा अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती यांनी सुचित केले. | प्रारुप सादरीकरणानुसार कार्यपध्दती अंगिकारण्यास उपस्थित सदस्यांनी मंजूरी दिली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | श्री. जोशी, सदस्य यांनी फेरीवाल्याचा बायोमेट्रीक करताना फेरीवाल्याबरोबर त्याचे कुटुंबातील सर्व व्यक्तींचा बायोमेट्रीक सर्व्हे होणार आहे काय? असा प्रश्न विचारला.<br>त्यावेळी श्री.डी.एस.चाबुकस्वार, उप आयुक्त (परवाना) यांनी असा खुलासा केला की, बायोमेट्रीक फक्त फेरीवाला व्यावसायीकाचेच होईल. तथापि त्याचे कुटुंबाचा ग्रुप फोटो अर्जाबरोबर घेण्यात येऊन तो संगणक प्रणालीमध्ये साठविण्यात येणार आहे. जेणेकरुन फेरीवाला कुटुंबाव्यतिरिक्त व्यक्तीला व्यवसाय करण्यास प्रतिबंध होऊ शकेल.<br>सिडको महामंडळाने फेरीवाला, भाजी,मासळी मार्केटसाठीचे आरक्षित भुखंड, कॅफेटेरियासाठी आरक्षित असलेले भुखंड तसेच स्टॉलसाठी आरक्षित ठेवलेल्या जागा महापालिकेकडे त्वरीत हस्तांतरीत केल्यास फेरीवाल्यांना जागा देण्यात अडचणी येणार नाहीत असे श्री.विनोद म्हात्रे, सदस्य यांनी मुद्दा मांडला. मा.आयुक्त तथा अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती यांनी उक्त प्रयोजनासाठी आरक्षित असलेले सर्व भूखंड तातडीने महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत अतिरिक्त शहर नियोजनकार, सिडको यांना सुचीत केले.<br>सिडको महामंडळामार्फत महापालिकेस जे भूखंड हस्तांतर करावयाचे आहेत, ते भूखंड हस्तांतरण करणेबाबतची कार्यवाही सिडकोमार्फत सुरु असलेबाबत श्री.किरण शिंदे, अतिरिक्त शहर नियोजनकार, सिडको यांनी खुलासा केला. | |

वरीलप्रमाणे सर्वकष चर्चा होऊन उप आयुक्त (परवाना) यांनी उपस्थित शहर फेरीवाला सर्व समिती सदस्य, सर्व विभागप्रमुख व कर्मचा-यांचे आभार मानून मा.आयुक्त तथा अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती यांच्या वतीने सभेचा समारोप करण्यात आला.

स्वाक्षरीत /-

**आयुक्त**
**तथा**
**अध्यक्ष**
**शहर फेरीवाला समिती**
**नवी मुंबई महानगरपालिका**

प्रत :- माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
वरील सर्व संबंधित

## नवी मुंबई महानगरपालिका
## उप आयुक्त (परवाना) कार्यालय

### शहर फेरीवाला समितीचा ठराव

सभा क्रमांक - ०३ दिनांक ०२/१२/२०१४
विषय क्रमांक - ०३ ठराव क्रमांक - ०३ खाते :- मा.महापालिका आयुक्त

---

संदर्भ :- उप आयुक्त (परवाना) यांचे पत्र क्रमांक- नमुंमपा/ परवाना विभाग/श.फे.स. /२८४८/२८४९/२०१४ दिनांक २५/११/२०१४

-----

**उप आयुक्त (परवाना) यांनी शिफारस केल्याप्रमाणे-**

नवी मुंबई महानगर-पालिका क्षेत्रातील ०८ विभाग कार्यालयांतर्गत फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे, बायोमेट्रीक सर्व्हे करणे, रजिस्ट्रेशन करणे व ओळखपत्र देणे यासाठी संगणक प्रणाली विकसित करणे व त्याची तीन वर्षे देखभाल दुरुस्तीची कामे करणे या निविदा कामामध्ये **"फेरीवाला व्यावसायिकास फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र देणे"** या वाढीव कामाचा समावेश करुन ऑनलाईन फेरनिविदा काढणेच्या कामास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

स्वाक्षरीत /-
**आयुक्त**
**तथा**
**अध्यक्ष**
**शहर फेरीवाला समिती**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**नवी मुंबई महानगरपालिका**
**उप आयुक्त (परवाना) कार्यालय**

**शहर फेरीवाला समितीचा ठराव**

सभा क्रमांक - ०३ दिनांक ०२/१२/२०१४
विषय क्रमांक - ०४ ठराव क्रमांक - ०४ खाते :- मा.महापालिका आयुक्त

---

संदर्भ :- उप आयुक्त (परवाना) यांचे पत्र क्रमांक- नमुंमपा/ परवाना विभाग/श.फे.स. /२८४८/२८४९/२०१४
दिनांक २५/११/२०१४

केंद्र शासनाच्या **"पदपथावरील विक्रेते (उपजिविका व संरक्षण व पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४"** ची महापालिका क्षेत्रात अंमलबजावणी करणेबाबतचे प्रारुप सादरीकरणाप्रमाणे कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

स्वाक्षरीत /-
**आयुक्त**
**तथा**
**अध्यक्ष**
**शहर फेरीवाला समिती**
**नवी मुंबई महानगरपालिका**